महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

श्रीप्रस्था, नालासोपारा-विरार लिंक रोड,एच.पी. पेट्रोलपंपाच्या पुढे, निळेमोरे नालासोपारा प ता. वसई जि. पालघर

दुरध्वनी क्र. (०२५०) २३२०८८०    Email ID- vasaisdo@gmail.com

क्र./व्हीडी/टे-२/हक्कनोंद/कावि- ५१५/२०२५
दिनांक-२४/०२/२०२६

प्रति,

१. मा. जिल्हा शल्यचिकीत्सक पालघर
२. उपअधिक्षक, भुमी अभिलेख वसई
३. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
४.श्री. कुलदिप वर्तक, जिल्हाध्यक्ष वसई विरार कॉंग्रेस कमीटी

**विषय**:- जमीनबाब क्र.वि.१३/२०२२ नुसार कोर्टातील उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयाने निर्णयाबाबत..... सर्व्हे नं. नवघर ५८ जिल्हा शल्यचिकीत्सक पालघर या सरकारी (प्राथमिक आरोग्य केंद्र) जागेवर अतिक्रमण केल्याबाबत व दिलेल्या आदेशानुसार मोजणी करुन ०-६०-७० गुंठे जागा कायम स्वरुपी हद्द कायम करण्याबाबत..

**संदर्भ**:-१. अर्जदार श्री. कुलदिप वर्तक, जिल्हाध्यक्ष वसई विरार कॉंग्रेस कमीटी रा. दावभिडू, सागरशेत रोड, मांडलई वसई प ता. वसई, जि. पालघर यांचा दि. १८/०२/२०२५ रोजीचा अर्ज
२.इकडील कार्यालयीन पत्र क्र. व्हीडी/टे-२/आरटीएस/कावि-२७८/२०२२५ दि. २१/०५/२०२५

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, अर्जदार श्री. कुलदिप वर्तक, कार्याध्यक्ष वसई विरार कॉंग्रेस कमीटी रा. दावभिडू, सागरशेत रोड, मांडलई वसई प ता. वसई, जि. पालघर यांचा उक्त विषयाबाबतचा अर्ज संदर्भिय पत्रानुसार इकडील कार्यालयास प्राप्त झाला आहे. मौजे नवघर स.नं. ५८ व ६५ मधील जमीनीबाबत इकडील कार्यालयीन आदेश क्र.व्हीडी/टे-२/जमीनबाब/कावि-१३/२०२२ दि १७/०४/२०२३ रोजीच्या आदेशानुसार उपअधिक्षक भुमी अभिलेख वसई यांना मोजणी करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

तसेच संदर्भिय पत्र क्र. २ नुसार आपणास कळविण्यात आलेले आहे. परंतू आजतागायत कार्यवाही करुन अहवाल सादर करणेत आलेला नाही. तरी अर्जदार यांनी अर्जानुसार व सदरहू आदेशानुसार कार्यवाही करावी तसा अनुपालन अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

उपविभागीय अधिकारी वसई